# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२—२१६५९४ E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com


गो.वि./म.वि /284 /२०१९ दिनांक: 28 /01/ २०१९

## परीपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य,
गोंडवाना विद्यापीठाशी
संलग्नित सर्व महाविद्यालय,
(जिल्हा —चंद्रपुर व गडचिरोली )

विषय :— उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत.

संदर्भ :—१ .क्र.उशिनाग/शिष्य—२०१८/डीबीटी/७३६ दिनांक १६/०१/२०१९

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयांन्वये आपणांस कळविण्यात येते कि, शिक्षण संचालनालय उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या कार्यालयाकडुन विद्यापीठाला उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत पत्र प्राप्त झालेले असुन सोबत संलग्नित केलेल्या पत्रानुसार महाविद्यालयाने कार्यवाही घ्यावी व केलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल विद्यापीठाच्या **Email:—arcollegesectiongug48@gmail.com** या मेल वर **Soft Copy** तसेच **Hard Copy** विद्यापीठात त्वरीत सादर करावे.

धन्यवाद!

आपला विश्वासु

सहपत्रः—संलग्नित उपरोक्तप्रमाणे.

(डॉ. व्ही.सी. सिल्हारे)
प्र.उपकुलसचिव(म.वि)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१
web: www.dhepune.gov.in
E-mail: scholarshiphd2@gmail.com
फोन नं.०२०/२६१२६९३९
फॅक्स ०२०/२६१११९५३

क्र.उशिसं/शिष्य-२०१८/डीबीटी/ 736
दि. १६/०१/२०१९

16 JAN 2019

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण.

**विषय :- उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणे बाबत...**

संदर्भ:- १. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि. ०७.१०.२०१७
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ४०७/तांशि-४, दि. २२.०२.२०१८
३. शासन निर्णय क्र.जीएडी-मातंस-२०१८/सीआर १३८/एस. १/३९, दि. १२.१०.२०१८
४. संचालनालयाचे दि. १९.९.१८, दि. ४.१०.१८, दि. ११.१०.१८, दि. १५.१०.१८, दि. १७.१०.१८, दि. १९.१०.१८, दि. २३.१०.१८, दि. २८.१०.१८, दि. १.१२.१८, दि. १०.१२.१८, दि. ११.१२.१८, दि. १३.१२.१८, दि. १९.१२.१८, दि. २१.१२.१८, दि. २७.१२.१८, दि. ३१.१२.१८, दि. ४.०१.१९, दि. ९.०१.१९, दि. १०.०१.१९, दि. १४.०१.१९ रोजीचे पत्रे.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्यशासनाच्या शिष्यवृत्ती योजनांची डीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. याबाबत डीबीटी पोर्टलवर व्हिडीओ, मॅन्युअल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. तसेच उपरोक्त संदर्भ क्र. ३ वरील संचालनालयाच्या विविध पत्रान्वये वारंवार सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तथापि सद्यस्थितीत शिष्यवृत्तीसाठी प्राप्त अर्जांची संख्या ही पात्र विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात खूप कमी आहे. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने भरण्याची अंतिम मुदत दि. ३१.०१.२०१९ असून, पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी शक्य तितक्या लवकर अर्ज भरणेसाठी कळविण्यात यावे.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना व इतर शिष्यवृत्तीसाठी **विशेषतः विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण शास्त्र अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तींचे अर्ज कमी प्रमाणात प्राप्त झालेले निदर्शनास येत असून,** अशा महाविद्यालयांच्या प्राचार्यांना त्यांचे महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी विशेष कार्यशाळा आयोजित करणेबाबत कळविण्यात यावे. तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीचा महाविद्यालय निहाय एकत्रित अहवाल संचालनालयास पाठविण्यात यावा.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- १. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना कार्यवाहीसाठी.
३. प्राचार्य, सर्व शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित- कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना कार्यवाहीसाठी.

Scanned by CamScanner